ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR :2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 7 | MARCH - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

सातारा जिल्ह्यातील छोडो भारतचा क्रांतिलढा

विवेकानंद राजाराम माने
इतिहास विभागप्रमुख,
क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली.

प्रस्तावना:

क्रीप्स मिशनची फलनिष्पत्ती भयानक निराशाजनक असल्याचे म. गांधींनी जाहीर करताच सातारा जिल्ह्यातील राजकीय वातावरण बदलू लागले. जनआंदोलन करावे लागेल असे संकेत मिळू लागले. महायुद्ध चालू असताना साम्राज्यशाहीचे सरकार जनआंदोलन चिरडून टाकणारच असा युक्तिवाद मांडण्यात आला. त्यामुळे भूमिगत आंदोलनाची संघटना उभारणे हा पर्याय सातारकरांनी पसंत केला. भूमिगत संघटनेचा पुरस्कार करणारे व जनआंदोलनासाठी प्रथम पासूनच जहाल भूमिका घेतलेले कॉंग्रेस समाजवादी पुढारी अच्युतराव पटवर्धन व शिरूभाऊ लिमये हे नाना पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करीत होते. कॉंग्रेस समितीने 'छोडो भारत' चा ठराव मंजूर केला त्याच दिवशी मुंबईत सातारकरांच्या भूमिगत कारवायांचा प्रारंभ झाला. तथापि बहुसंख्य सातारा कार्यकर्ते मुंबई शहरातच भूमिगत राहिले. मुंबईतच भूमिगत झाल्याने साताऱ्यामधील बहुसंख्य आंदोलक अटक टाळू शकले. त्यांनी काही काळासाठी तरी पोलिसांवर डावपेचात्मक विजय प्राप्त केला.

सातारा जिल्ह्यातील छोडो भारतचा क्रांतिलढा गांधीवादी आकृतिबंधानुसार नव्हता. लढ्याला हिंसक व दहशतवादी स्वरूप आले. गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचा येथे उपयोग करण्यात आला. नाना रामचंद्र पाटील, गोविंदराव देशपांडे, आचार्य शं. द. जावडेकर, स्वामी रामानंद भारती, एस. आर. कुलकर्णी, बुवा गोसावी, सोमण, कानडे यांच्यासारखे काही नेते व कार्यकर्ते मुंबईला न जाता संघटना बांधणीसाठी जिल्ह्यातच राहिले.[१] छोडो भारत ठराव संमत होताच ८ ऑगस्टच्या रात्री मुंबईतील बद्रिकाश्रमात सातारच्या कॉंग्रेस व कॉंग्रेस समाजवादी कार्यकर्त्यांची गुप्त बैठक भरली. त्यात निर्णय घेण्यात आला की, इंग्रज नोकरशाही धरपकड करण्याचे सत्र आमलात आणण्याची शक्यता असल्याने प्रमुख व्यक्तींनी भूमिगत राहून सूत्रसंचालन करावे आणि पुढील कार्यक्रमाबाबत वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनानुसार लढा चालवावा.

सरकारी दडपशाहीच्या अंमलाने व पोलिसांच्या हिंसाचाराने प्रक्षुब्ध झालेल्या जनतेने जिल्ह्यातील सर्व शहरांमध्ये व शेकडों गावांमध्ये स्वयंस्फुर्त हरताळ पाळला. सरकारी कारवाईच्या विरोधात निषेधपर सभा झाल्या. घोषणा, मिरवणुका, प्रचारसभा व निषेधाच्या सभा यामुळे वातावरण तापले. उत्स्फूर्त हरताळ, निरोधने (पिकेटींग) व शाळांवरील बहिष्काराने आंदोलनाचा प्रारंभ झाला. मात्र हा उत्साह व समर्पणाची भावना टिकवून ठेवण्याची गरज असल्याने जनतेची विखुरलेली शक्ती संघटित करण्याचे काम नाना पाटील व इतर पुढाऱ्यांनी हाती घेतले. बाबुराव गोखले कराडच्या टिळक हायस्कुलच्या मुलांना संघटित करू लागले. श. द. जावडेकरांच्या अटकेच्या निषेधार्थ इस्लामपूरला हरताळ पाळण्यात आला. तथापि सरकारी दडपशाही वाढतच राहिली. प्रखर राष्ट्रवादाने ज्यांना प्रेरित केले होते अशी माणसे नाना पाटील, किसन वीर यांच्या मार्गदर्शनानुसार एकत्र आली व आपणच स्वत:चे मार्गदर्शक आहोत अशा भावनेने चळवळीत

कार्यरत झाली. इंग्रज सरकारची प्रतिके व बलस्थाने आणि पोलादी शासन यंत्रणा यावर हल्ला करण्यास प्रारंभ झाला.

दुसऱ्या महायुद्धात मानवेंद्र रॉय व त्यांची रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी यांनी दोस्त राष्ट्रांच्या युद्ध प्रयत्नांना मदत करण्याचे धोरण जाहीर केले. त्यानुसार रॉय यांच्या अनुयायांनी पक्षाच्या धोरणानुसार इंग्रजांना पाठिंबा दिला व छोडो भारत आंदोलनास विरोध केला. महायुद्धात रशियाचा विजय आणि फॅसिझमचा पराभव करण्यासाठी, इंग्रजांशी सहकार्य करण्यासाठी सातारा जिल्ह्यातील रॉयवादी मंडळी प्रचार करीत असल्याचे पोलिसांच्या गोपनिय अहवालामध्ये नमुद केले आहे.[२] उपरोक्त व्यक्ती व्यतिरीक्त पांडूरंग श्रीपत यादव, आप्पासाहेब देशपांडे वकील हेदेखील युद्धाचा प्रचार करीत. मात्र रॉयवादी मंडळींचा फारसा प्रभाव पडण्यासारखी स्थिती नव्हती. तसेच अत्यल्प प्रभावक्षेत्र असलेले सातारा, कराड व वाईचे काही हिंदू महासभा सभासदही कॉंग्रेसच्या आंदोलनाविरूद्ध प्रचार करीत.

ऑगस्ट ठरावानुसार किर्लोस्करवाडीच्या कारखान्यात नाना पाटलांनी संप घडवून आणला. सातारा जिल्ह्यात चळवळीचा पहिला कार्यक्रम म्हणून मामलेदार कार्यालयांवर प्रचंड जनसमुदायाचे मोर्चे आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार २४ ऑगस्ट १९४२ रोजी कराडच्या तालुका कार्यालयावर पहिला मोर्चा बाळकू आण्णा पाटील—उंडाळकर, काशिनाथ राजाराम देशमुख, ल. ग. कुलकर्णी तथा कासेगावकर वैद्य, यशवंतराव चव्हाण इत्यादींनी नेला. मात्र जिल्ह्यातील पहिली मोठी घटना ३ सप्टेंबर १९४२ तासगावचा मोर्चा ही होय. नाना पाटील यांनीच नियोजन केलेल्या या पाच— सहा हजार शेतकऱ्यांच्या मोर्चाचे नेतृत्व त्यांनी स्वत:कडे न घेता कृष्णा रामा कुऱ्हाडे, वि. स. पागे, गोविंद खोत, डॉ. सोहोनी यांच्याकडे सोपविले. मामलेदार कार्यालयावर चाल करून गेलेल्या या मोर्चाचा मुकाबला करण्यासाठी मामलेदाराकडे ३३ सशस्त्र व नऊ लाठीधारी पोलिसांची तुकडी होती. तथापि मोर्चाची धडक इतकी जोरदार होती की, मामलेदारास मोर्चाचा प्रतिकार करणे शक्य झाले नाही. इतकेच नव्हे तर त्याने आपल्या कार्यालयाचा मुख्य दरवाजा उघडून कार्यालयावर कॉंग्रेसचा राष्ट्रध्वज फडकवून झेंडावंदन करू दिले. तासगाव तालुका न्यायाधिशालाही मोर्चाच्या नेत्यांनी खादी टोपी परिधान करावयास व राष्ट्रीय घोषणा देण्यास भाग पाडले.

शासकीय अधिकाऱ्यांनी कॉंग्रेसच्या मोर्चापुढे पत्करलेल्या अशा शरणागतीने मुंबई इलाख्याचे प्रशासन फारच अस्वस्थ झाले होते.[३] इंग्रज सरकारची सेनादलाची आणि युद्ध सामग्रीची वाहतूक विस्थापित करून सरकारला जेरीस आणणे हा हेतू असल्याने रेल्वे गाड्या रूळावरून घसरवण्याच्या घटना या जिल्ह्यात वारंवार घडत असत. त्यासाठी वित्तबळाची आवश्यकता असल्याने राष्ट्रीय कार्यासाठी पैसा मिळविण्याच्या हेतुने ऑक्टोबरपासून राजकीय दरोडे घालण्यास प्रारंभ करण्यात आला. जिल्ह्यात क्रांतिकारकांना अभूतपूर्व, विलक्षण जनपाठिंबा होता.

ऑक्टोबर १९४२ च्या उत्तरार्धात झुंड दंडेली (मॉब व्हायोलेन्स) वाढली. चळवळीचे जोरदार वारे वाहत असलेल्या औंध संस्थानातील २०० सशस्त्र स्वातंत्र्य सैनिकांनी नाना पाटलांच्या नेतृत्वाखाली सावळज पोलीस चौकी जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. पोलिसांशी झालेल्या या लढाईत कॉंग्रेसचा एक सैनिक हुतात्मा झाला व बऱ्याच जणांना जबर जखमा झाल्या. दुर्दैवाने सावळजच्या कारवाईत गावकऱ्यांनी पोलिसांना मदत केली. गावकऱ्यांच्या फितुरीमुळे पोलीस चौकी जरी ताब्यात आली नाही तरी नाना पाटलांनी सरकारला मोठा धक्का दिला. ब्रिटिशांच्या अधिकाराखालील शेणोली आणि तत्कालीन जमखिंडी संस्थानातील व सध्याच्या सातारा जिल्ह्यातील शिरवडे ही रेल्वे स्थानके जाळून नष्ट करण्यात आली. शिरवडे येथून स्वातंत्र्य सैनिकांनी सरकारी बंदुका आणि दारूगोळा हस्तगत केला.

सामान्य जनतेचा दहशतवादी कृत्यांना पाठिंबा नसल्याचे जिल्हाधिकारी सरकारला कळवित असले, तरी लोकांच्या पाठिंब्याशिवाय भूमिगत चळवळ यशस्वी होणे शक्य नव्हते. कुऱ्हाडी, काठ्या, भाले घेतलेले आंदोलकांचे गट शासन यंत्रणा निकामी करण्यात कार्यरत होते. पोस्टाच्या थैल्या व मनी ऑर्डरींच्या रकमा नेत असलेल्या पोस्टमन मंडळींवर स्वातंत्र्य सैनिकांची पथके चढाई करून पैसे हस्तगत करीत असत. बरेच डाक बंगले व चावडीच्या इमारती जाळण्यात आल्या. सातारा मधील प्रत्येक तालुक्याच्या अधिकाऱ्यांना सक्त ताकिद देऊन कोणत्याही परिस्थितीत तासगावची पुनरावृत्ती होता कामा नये असा हुकूम इंग्रज सरकारने दिला. अशाही परिस्थितीत इस्लामपूरला मोठा मोर्चा आयोजित

करण्यासाठी नाना पाटलांनी आपल्या सहकाऱ्यांना संघटित केले. पूर्व भागातील स्वातंत्र्यसेनानी गोविंदराव खोत यांच्या नेतृत्वाखाली, तर पश्चिम भागातील सेना पांडुरंग गोविंद पाटील उर्फ पांडू मास्तर यांच्या नेतृत्वाखाली आणून इस्लामपूर मामलेदार कार्यालयावर ८ सप्टेंबर १९४२ रोजी प्रचंड मोर्चा नेण्याची योजना होती. त्यानुसार पांडुरंग पाटलांचे पथक इस्लामपूरला आधी येऊन त्यांनी मैदानावर सभेला प्रारंभ करताच जिल्हा पोलिस अधिक्षकांच्या आदेशानुसार जोरदार लाठीहल्ला करण्यात आला. अल्पावधीत गोविंदराव खोतांचा मोर्चा येताच पोलिसांनी गोळीबारास सुरूवात केली. यात किर्लोस्करवाडीचे पंड्या इंजिनियर व कामेरीचे बारबटे धारातीर्थी पडले. या आंदोलनात आप्पासाहेब लाड, नाथाजी लाड, जी. डी. लाड, भगवान पाटील इत्यादी सहभागी होते.[४] याच दिवशी वडूज येथील मामलेदार (खटाव) कार्यालयावर देखील नि:शस्त्र मोर्चा नेण्यात आला. औंध, खटाव भागातील शेतकऱ्यांना संघटित करून गौरीहर सिंहासने, परशुराम घार्गे (घाडगे) यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचा मोर्चा काढला. या जनसमुदायावरही पोलिसांनी अमानुष गोळीबार करून परशुराम घार्गे व त्यांच्या सात सहकाऱ्यांना ठार केले.

वडूज व इस्लामपूरच्या मोर्चांनी स्वातंत्र्य आंदोलकांना चांगलाच धडा मिळाला. त्यामुळे नि:शस्त्र मोर्चे व सत्याग्रही स्वरूपाचा लढा थांबवण्याचा विचार पुढे आला. अहिंसक मार्गाने आंदोलन चालू ठेवणे अशक्य झाल्याने विचारविनिमय करण्यासाठी नाना पाटील यांनी सप्टेंबरच्या अखेरीस कुंडल येथे काही प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली. सर्वांनी भूमिगत राहूनच कार्य चालू ठेवण्याचा या बैठकीत निर्णय झाला.

सातारा जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी व्यवस्थितपणे लढा चालविण्यासाठी कार्यकर्त्यांचे पुढीलप्रमाणे पाच प्रमुख गट पाडले होते. — कुंडल गट, शिराळा आणि वाळवा (पश्चिम भाग) गट, कराड गट, उत्तरेचा गट आणि सांगली गट. कराड व सभोवतीच्या परिसरात कार्यरत असलेल्या कराड गटाचे नेतृत्व प्रथम यशवंतराव बळवंत चव्हाण यांनी आणि त्यांना अटक झाल्यावर ल. ग. कुलकर्णी तथा कासेगावकर वैद्य आणि माधवराव जाधव यांनी केले. सांगली परिसरात कार्यरत असलेल्या सांगली गटाचे पुढारी वसंतराव बंडू पाटील तथा वसंत दादा होते. याशिवाय काशीनाथ देशमुख, स्वामी रामानंद भारती, भुपाल कत्ते आमनापूर इत्यादी गट कार्यरत होते.[५] गटाची ही यादी परिपूर्ण नाही, शिवाय गटाची विभागणी देखील काटेकोर नाही. ही सर्व चळवळ भूमिगत असल्याने त्याबद्दल लिखीत पुरावा उपलब्ध नाही. कुंडल गट प्रत्यक्ष कृतीच्या दृष्टीने आघाडीवर होता. गांधीजींच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय क्रांतिलढ्याचे सूत्रसंचालन करणाऱ्या भूमिगत संचालनालयाची मुंबईत गोपनीय बैठक झाली. यानुसार नाना पाटील यांनी प्रतिसरकारची योजना आखली. गनिमी काव्याचा अवलंब करून स्वतंत्ररित्या संघर्ष चालू ठेवावा आणि विधायक कार्य हाती घ्यावे, अशी ती योजना होती. साताऱ्याच्या प्रतिसरकारचा हा प्रारंभ होता.

मार्च—एप्रिलमध्ये असाही एक विचार मांडण्यात आला की, दहशतवादी आंदोलन पुढे चालू ठेवण्यात आता अर्थ नाही. या विचाराचा पुरस्कार करणाऱ्यांमध्ये यशवंतराव चव्हाण हे प्रमुख होते. १जून १९४३ रोजी कामेरी येथे किसन वीर यांनी प्रमुख भूमिगत नेत्यांची बैठक बोलावली. कामेरीच्या या बैठकीने प्रतिसरकारचा रीतसर प्रारंभ केला.[६] ७ जून १९४३ रोजी प्रतिसरकारच्या ५० सशस्त्र सैनिकांनी बिचूद व शेणोली रेल्वे स्थानका दरम्यानच्या खिंडीजवळ लोहमार्गावर मोठमोठे दगड ठेवून रेल्वेची पे स्पेशल गाडी अडवली. केवळ २८ मिनिटात वीस हजार रुपयांचा निधी पळविला.

जनतेच्या पाठिंब्यामुळेच १ जून १९४३ पासून १३ जून १९४६ पर्यंत म्हणजे तीन वर्षाहून अधिक काळ प्रतिसरकार कार्यरत राहिले. या सरकारने लोकन्यायालये स्थापन केली. शेकडो शेतकऱ्यांचे आपापसांतील तंटे व दावे सामोपचाराने सोडविले. मद्य विक्रीची दुकाने बंद केली. सावकारांनी लुबाडलेल्या जमिनी या यंत्रणेने शेतमालकांना परत मिळवून दिल्या. सावकारांवर जबर दंड ठोठावला. साताऱ्याचे प्रतिसरकार 'स्वतंत्र भारत' नावाचे एक पाक्षिक प्रकाशित करीत होते. त्यातून या संघटनेची माहीती तर दिली जात असेच, शिवाय वैचारिक लेख देखील प्रकाशित होत. वस्तुत: जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचे सर्व जेष्ठ नेते व तालुका पातळीवरील जुने कार्यकर्ते यांना सरकारने प्रारंभीच पकडून स्थानबद्ध केलेले होते. तथापि ग्रामीण भागातील अनेक कार्यकर्ते वेळीच भूमिगत झाले व त्यांनी भूमिगत संघटनाच उभारली. पाचशेहून अधिक लोक एकत्र आले आणि त्यांनी वेगवेगळे गट पाडून मोठी संघटना तयार केली.

धुळे जिल्ह्यात घडलेली तथापि प्रतिसरकारच्या प्रमुख कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग असलेली स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्त्वाची घटना म्हणजे धुळे खजिन्याची लूट ही होय. खजिना १४ एप्रिल १९४४ रोजी धुळे येथे एका बसमधून नेण्यात येणार असल्याचे या क्रांतिकारकांना समजले. दिवसा १०—११ वाजता खजिना हस्तगत केला. त्यात ५,५१,००० रूपयांची सरकारी रोख रक्कम होती. शिवाय दोन बंदुका व २० काडतुसे प्राप्त झाली.

१९४२ च्या चळवळीत जिल्ह्यातील पुढील महिलांनी उल्लेखनिय कार्य केले आहे. प्रभाताई भगवानराव सुर्यवंशी (पारे), राजुताई बळवंत बिरनाळे (अंकलखोप), कमल तुकाराम लाड, सुरेखाताई जगन्नाथ लाड, सिंधुताई दौंडे, विजयाताई गणपती लाड, गंगुताई नाथाजी लाड (सर्वजणी कुंडल), कुसुम गोंविंदराव गुजर, मुक्ता चिंतोपंत काळे, सुमन जगन्नाथ गायकवाड, वासंती माधवराव पोळ, वत्सलाताई गणेश महामुनी, मंदा हिराचंद गुजर, लता गोविद मेहता, विमल गणपत चंद्रशहा, सुशिला गणपती शिंत्रे, शकुतला गंगाधर शिंत्रे, सुमन राजाराम जोगळेकर, शकुंतला विश्वनाथ शिंत्रे, प्रमिला बाबूलाल शहा, प्रभावती विठ्ठल पागे, सुनंदा जगदाळे, सुधा शिवाजीराव पवार, कमल मोतीलाल शहा, बेबी कोल्हटकर, सुमन दत्तात्रय शेटे, सुशीला देसाई (सर्वजणी तासगाव), कुसुमताई कुलकर्णी, डॉ. लता देशपांडे, विजया जोशी (सर्वजणी सांगली). वसंतमाला केशवराव साळुंखे (आष्टा), माई हिंदुराव पाटील (मांजर्डे), शालूताई गोविंद मिरगे (पारे), शशिकला मस्के (पलूस), इंदुताई बाबुजी पाटणकर (कासेगाव), हौसाताई भगवानराव पाटील (हणमंतवडिये), विमल गोपाळराव पाटील (येळावी), राजाक्का पाटील (ऐतवडे बुद्रुक), हेमलता चंद्रशेखर वाले (कवठेपिरान), लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी (वाळवा).

दरम्यान प्रांतीय निवडणुका होऊन कॉंग्रेस मंत्रिमंडळाने सत्ताग्रहण केले. मुंबई राज्याचे गृहमंत्री मोरारजीभाई देसाई यांच्या आदेशानुसार शासनाने २६ एप्रिल १९४६ रोजी राजकीय बंदिवानांसाठी सर्वक्षमा (ॲमनेस्टी) जाहीर केली. महत्त्वाचे भूमिगत नेते ५ मे १९४६ रोजी प्रकट झाले. १३ जून रोजी जिल्हा कॉंग्रेस समितीने एक पत्रक काढून न्यायदान मंडळाचे कामकाज बंद करण्याचे आवाहन केले. पुढील काळात सातारा प्रतिसरकारचे प्रमुख क्रांतिसिंह नाना पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजवादी चळवळीस वाहून घेतले.

निष्कर्ष:

ब्रिटीश सरकारजवळ प्रचंड पोलिस दल व सेना होती. जिल्ह्यात थोड्या थोड्या अंतरावर पोलीस व सेना पथके तैनात केलेली होती. अशा कडक बंदोबस्तात गनिमी काव्याने लढून पोलादी सरकारी यंत्रणा खिळखिळी करणे सोपे नव्हते. त्यामुळे प्रतिसरकारची कामगिरी खचितच कौतुकास्पद मानावी लागते. ग्रामीण भागातील स्वातंत्र्य सैनिकांच्या संघटना कुशलतेने व वीर वृत्तीमुळे प्रतिसरकार निर्माण झाले आणि दीर्घकाळ कार्यरत राहिले. १९४२ च्या क्रांतिलढ्यात भारतात महान कार्य करून दाखविलेल्या बलिया, गाझिपूर, तामलुक व कंताई येथील प्रतिसरकारांशी सातारच्या प्रतिसरकारची तुलना करण्याजोगी आहे. त्यांच्यात एक फरक असा दिसतो की, या चार ठिकाणची प्रतिसरकारे फार काळ कार्यरत राहू शकली नाहीत. सातारा प्रतिसरकारची यंत्रणा मात्र जुलै १९४६ पर्यंत अस्तित्वात राहिली होती.

संदर्भ :

१) मुंबई सरकार, होम डिपार्टमेंट, स्पेशल ब्रॅंच, फाईल क्रमांक, ८००(७४)(१४)—तीन१९४१—४३
२) कित्ता, फाईल
३) मुंबई सरकार, गृह विभागाने केंद्रीय गृह विभागास पाठविलेला गोपनिय पाक्षिकअहवाल दिनांक १८/९/१९४२
४) पाटील उत्तमराव, क्रांतिवीर नाना पाटील, लोकविकास प्रकाशन, सातारा, १९९५ पृ. २३
५) गुरव बाबुराव, भारतातील स्वातंत्र्यचळवळ लोकविद्रोहाचा धगधगता अंगार, निर्मिती विचारमंच कोल्हापूर, १९९९, पृ. १४३
६) सातारा जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र शासन, पृ. २१२
७) माने माधवराव, राष्ट्र सेवा दलातील अनमोल हिरेमोती, निर्मिती संवाद प्रॉ. प्रा.लि. कोल्हापूर, २०१४, पृ. २४७—२४८